# चित्ते नदी पुनरूज्जीवन अभियान – शाश्वत ग्रामविकासाचे मॉडेल.

| बारा गावे टॅकर मुक्त | लोकसहभागातुन उभारली जलचळवळ | नदीचे झाले पुनरूज्जीवन |
|---|---|---|

पाण्याचे दुर्भिक्ष्य, सतत दुष्काळाच्या छायेत वावरणाऱ्या चित्ते नदी खोऱ्यातील, परिसराचा खऱ्या अर्थाने कायापालट करणारे अभियान म्हणजे चित्ते नदी पुनरूज्जीवन अभियान होय. ग्रामविकास संस्थेच्या पुढकाराने लोकसहभागातुन वसुंधरा, सकाळ माध्यम समुह, केअरींग फ्रेंडस, जलयुक्त शिवार यांच्या सहकार्याने हे काम पुर्णत्वाकडे जात आहे. औरंगाबाद शहराच्या दक्षिणेला १२ कि.मी अंतरावरील चित्ते नदी खोऱ्यात भुरचनेचा शास्त्रोक्त अभ्यासातुन माथा ते पायथा असे जलव्यवस्थापन व शाश्वत ग्रामविकासाचे मॉडेल उभे राहिले आहे. महाराष्ट्रात जलव्यवस्थापनाचे व शाश्वत ग्रामविकासाची काही आदर्श मॉडेल उभी आहेत. परंतु एका गावाला केंद्रस्थानी मानून ही सर्व कामे झालेली आहेत. चित्ते नदी प्रनरूज्जीवन अभियान याला अपवाद आहे. १२ प्रमुख गावांचा समावेश असलेले एक नदीच खोर केद्रस्थानी ठेवुन हे अभियान राबविण्यात येत आहे. चित्ते नदी खोऱ्याच्या सर्वागीन विकासाकरीता खऱ्या अर्थाने लोकाभिमुख लोकचळवळ उभारण्यात आलेली आहे.

सततच्या दुष्काळामुळे मराठवाडयाचे कधीही भरून निघणार नाही एवढे मोठे नुकसान झाले. ग्रामविकास संस्थेच्या माध्यमातुन गेल्या दोन दशकात मराठवाडयात दुष्काळ निवारणाचे विविध प्रकल्प राबविण्यात आलेले आहेत. दुष्काळ कायमचा संपवायचा असल्यास एका गावाचा विचार न करता एका नदी खोऱ्याचा किंवा क्लस्टरचा विचार झाला पाहीजे. हे सर्व विविध प्रयोगाअंती कळत होते. परंतु पर्याय नव्हाता. औरंगाबादच्या दक्षिणेला १२ कि.मी. अंतरावर असलेल्या चित्ते नदी खोऱ्यात वसुंधरा प्रकल्पाच्या माध्यमातुन २०१२ साली ही संधी चालुन आली. या संधीचे सोने करायचेच या इराद्याने आजतागायत एखाद्या मृतप्राय नदीला पुनरूज्जीवन करायचे या सुप्त ईच्छाशक्तीला अंकुर फुटले. चित्ते नदी खोऱ्याच्या सर्वागीन विकासाकरीता वसुंधरा प्रकल्पाचा अपुरा असलेला निधी यावर मात करण्यासाठी, सकाळ माध्यम समुह, केअरींग फ्रेंडस मुंबई, जलयुक्त शिवार अभियान यांची मोलाची साथ लाभली.यामुळे अशक्य काम शक्य झाले.

**पार्श्वभुमी :–**

औरंगाबादच्या दक्षिणेला १२ कि.मी. अंतरावरील चित्ते खोऱ्यात नैसर्गीक साधन – संपत्तीची विपुलता होती. चित्ते नदी दुथडी भरून वहात असल्यामुळे पिण्यासाठी, पशुधना साठी शेतीसाठी पाण्याची उपलब्धता होती. खोऱ्यातील माथ्यावरील गावातील उपजिवीका लाकडाच्या मोळया व गवताचे भारे विकुन भागवली जायची. दुध दुभते वनराई विपुल असल्यामुळे लोक सुखी व समाधानी होते. औरंगाबाद शहराची बाजारपेठ जवळ असल्यामुळे खोऱ्यात एकुनच सुबत्ता होती.

कालातराने झालेली वृक्षतोड, जलव्यवस्थापनाकडे झालेले दुर्लक्ष्य, संघटीतपणाचा अभाव यामुळे दुष्काळ नित्याचाच झाला. औरंगाबाद शहराच्या जवळ असुनही रस्तयाची दयनीय अवस्था, स्थानीक रोजगार व मुलभुत सुविधाचा अभाव यामुळे स्थलातंर वाढले. २०१२ च्या दुष्काळामुळे तर या खोऱ्यातील जनतेचे अतोनात हाल झाले. चाऱ्याअभावी पशुधन विकावे लागले. फळबागा तोडाव्या लागल्या. महिलाना घागरभर पाण्यासाठी टॅकरची वाट पहात रात्र, रात्र, जागुन काढावी लागली. एकुनच परिस्थीती हाताबाहेर गेली व कधीही भरून निघणार नाही एवढे मोठे नुकसान झाले.

**थोडक्यात :–**

चित्ते नदी औरंगाबादच्या दक्षिणेला १२ कि.मी. अंतरावर असुन, या खोऱ्याचे क्षेत्रफळ ६४२७ हे. आहे. माथ्यावरील सिंदोन भिंदोन ते पायथ्याकडील एकोड, पाचोड, चित्तेगाव अशा प्रमुख १२ गावांचा या खोऱ्यात समावेश आहे. यात १९ लघु पाणलोटाचा समावेश असुन १५००० लोकसंख्येची उपजिवीका या भागातुन वाहणाऱ्या चित्ते नदीवर अवलंबुन आहे. चित्ते नदी या भागातून साधारणत: १७ कि.मी. पर्यत वाहत जावून सुखना धरणांत विसर्जीत होते. या भागात जमिनीचा उतार तीव्र असुन प्रकार मध्यम आहे. भुस्तरामध्ये काळा पाषाण, मांजऱ्या खडक, गेरू (रेड बोल) यांचा समावेश आहे. समुद्रसपाटीपासुन माथा उंची ७९३ मी. तर पायथा उंची ५३७ मी. आहे. खरीप पीकामध्ये बाजरी, मका, कापुस तर रब्बीमध्ये ज्वारी,गहु,कांदा, तर उन्हाळयामध्ये मोसंबी, डाळींब, भाजीपाला ही पीके घेतली जातात. वन व पडिक जमीनीचे क्षेत्र मोठे आहे.

**अशी झाली सुरूवात :–**

चित्ते नदी पुनरूज्जीवन अभियानाच्या माध्यमातुन लोकाभिमुख जलचळवळ उभी करून चित्ते नदी खोऱ्याचा सर्वागीन विकास साध्यण्याकरीता दि. ६ फेब्रुवारी २०१५ रोजी स्वामी विवेकानंद विद्यालय चित्तेपिंपळगाव येथे विधानसभा अध्यक्ष मा. हरीभाऊ बागडे यांच्या अध्यक्षतेखाली चित्ते खोऱ्यातील लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, व ग्रामस्थ याची बैठक होवुन, दहा कलमी कार्यक्रम निश्चीत करण्यात आला. यामध्ये माथा ते पायथा उपचार व शाश्वत ग्रामविकास याचा अंतर्भाव होता. प्रथम टप्यात ग्रामसभा, समाजप्रबोधन, क्षमताबांधणी प्रशिक्षण, हिवरे बाजार येथे ग्रामस्थांची सहल, व गाव तेथे प्राधान्यक्रमाने लोकांच्या प्रमुख गरजेवर आधारीत कॉक्रीट रोड, सोलार लाईट, जनरेटर, हया मुलभुत कामाबरोबरच जलव्यवस्थापनासाठी कंपार्टमेंट बंडीग, डिप.सी.सी.टी. शेततळे, ही काम केल्यामुळे झपाटयाने भूजल पातळी वाढली व खऱ्या अर्थाने चित्ते नदी पुनरूज्जीवन अभियानास सुरूवात झाली.

## आजतागायत माथा ते पायथा चित्ते नदी खोऱ्यात झालेली जलव्यवस्थापनाची कामे

| अनु. क्र | कामाचा प्रकार | संख्या / हे. |
|---|---|---|
| १ | डीप.सी.सी.टी | १६८ हे. |
| २ | कंपार्टमेंट बंडीग | २५०० हे. |
| ३ | साखळी सिमेंट बंधारे | २५ |
| ४ | चित्ते नदीचे रूंदीकरण व खोलीकर | १५ कि.मी |
| ५ | शेततळे | ३१ |
| ६ | पाझर तलावातील गाळ काढणे | ७०००० घ.मी. |

**दृष्यपरिणाम :—**

चित्ते नदी खोऱ्यातील भुगर्भाचा शास्त्रोक्त अभ्यास करून माथा ते पायथा या तत्वानुसार कामे झाल्यामुळे जलसमृद्धी उपलब्ध झाली आहे.

- पूर व मातिचे धूप नियंत्रण.
- भूजलपातळीत ४ मी. ने वाढ.
- सरंक्षीत सिंचन क्षेत्र २३०८ हे.
- बारमाही सिंचन क्षेत्र १२२० हे.
- दुध उत्पादनात ४६९५० ली ने वाढ.
- भाजीपाला, व फळबागा क्षेत्रात वाढ आणि पीक पद्धतीत बदल.
- पाण्याचा कार्यक्षम वापराकरीता ठिंबकचा वापर .
- बारा गावे टॅकरमुक्त.

**लोकसहभाग :—**

चित्ते नदी पुनरूज्जीवन अभियानात लोकसहभाग ही सर्वात जमेची बाजु आहे. २९ पैकी १२ पाझर तलावातील गाळ काढणे, १५ कि.मी. नदीचे रूंदीकरण व खोलीकरण ही दीड कोटीचे कामे लोकसहभागातुन झालेली आहेत. यामध्ये सकाळ रिलीफ फंड, केअरींग फ्रेंडस मुंबई, जलयुक्त शिवार अभियान, देवगीरी महाविद्यालयाच्या प्राध्यापकाचा एक दिवसाचा पगार, तनिष्का सदस्य, गोसवर्धन सहकारी दुध व्यवसाईक संस्था चित्तेपिंपळगाव, महामार्गाचे काम करीत असलेली वाय. पी.देशमुख कंपनी, सिंदोन येथील जलमित्रानी होळीसाठी पळसाच्या फुलापासुन नैसर्गीक रंग तयार करून विक्रीतुन उभारलेला निधी व गाळ — मुरूम वाहुन नेणारे ग्रामस्थ यांचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल.

**मान्यवरांच्या भेटी :—**

चित्ते नदी पुनरूज्जीवन अभियान या दुष्काळ निवारणाच्या पथदर्शी प्रकल्पाची दखल घेवुन, आजतागायत मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, मा. विधानसभा अध्यक्ष हरीभाऊ बागडे, मा. पंकजाताई मुंडे, जलपुरूष राजेंद्रसिंह राणा, इस्त्रायलचे राजदुत डेव्हीड अकाव, खा. सुप्रीयाताई सुळे, खा. किरीट सोमय्या, यासह ग्रामविकास व पाणी क्षेत्रातील आनेक मान्यवरानी भेटी देवुन कामाचे कौतुक केलेले आहे.

**यापुढे :—**

जलसमृद्धीतुन आर्थीक समृद्धी साधण्यासाठी या पुढच्या काळात चित्ते नदी खोऱ्यात उर्वरीत जलव्यवस्थापनासाठी कामे करणे, पाण्याच्या कार्यक्षम वापराकरीता आधुनीक तंत्रज्ञानाचा अवलंब, पीक पद्धतीत बदल, कृषी पुरक व्यवसाय— उद्योग, मुलभुत सुविधा, स्थानीक पातळीवर रोजगार, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, या विषयात काम करून या खोऱ्याचा सर्वांगीन विकास करणे हे नियोजीत असुन, प्रत्यक्षात कामाला सुरूवातही झालेली आहे.

जलव्यवस्थापनाद्वारे एखादया गावाने दुष्काळावर मात केल्याचे आपल्या ऐकण्यात व पहाण्यात आहे. परंतु एखादया नदीचे पुनरूज्जीवन करून नदी खोऱ्यातील सर्व गावांचा शाश्वत विकास झाला आहे असे नाही. ग्रामविकास संस्थेने हे पथदर्शी अभियान राबवुन नदी खोऱ्यातील सर्व गावाचा शाश्वत विकास घडवुन आणलेला आहे. यासाठी चित्ते नदी खोऱ्यातील ग्रामस्थ, संस्थेचे सर्व कार्यकर्ते, सकाळ म.आवृत्तीचे संपादक संजय वरकड, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी संजय पडवळ, मराठवडा युवक विकास मंडळाचे अध्यक्ष मा. प्रविण घुगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

नरहरी शिवपुरे
सचिव
ग्रामविकास संस्था



सकाळच्या सहकार्याने चित्ते नदी पुनरूज्जीवन अभियान अंतर्गत झालेल्या कामाची पहाणी करतांना जलपुरूष मा. राजेंद्रसिंह राणा, सकाळ म.आवृत्तीचे संपादक संजय वरकड व ग्रामविकासचे सचिव नरहरी शिवपुरे



ग्रामविकास मत्री मा.पंकजाताई मुंडे, इस्त्राइलचे राजदूत मा. डेवीड अकाव, यांना चित्ते नदी पुनरूज्जीवन अभियानाची माहिती देताना ग्रामविकास संस्थेचे सचिव नरहरी शिवपुरे व इतर मान्यवर




चित्ते नदी पुनरूज्जीवन अभियान जलपुजन करतांना मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष मा. हरिभाऊ बागडे, आमदार संदिपान भुमरे, प्रवीण घुगे व ग्रामविकासचे सचिव नरहरी शिवपुरे व इतर मान्यवर




सिंदोन येथील पाण्याने भरलेला सिमेंट बांध